# शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सूचना

## ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरताना

- शासनाच्या निर्देशानुसार शिष्यवृत्तीचा Online अर्ज भरावयाचा असल्याने विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in/ या संकेतस्थळावरील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे.
- सदर अर्ज भरताना विद्यार्थ्याशी संबंधित कुठली शिष्यवृत्ती योजना आहे, याची विद्यार्थ्याने माहिती करून घेणे आवश्यक आहे. संकेतस्थळाचे अवलोकन केले असता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मार्फत (Social Justice and Special Assistance Department) अनुसूचित जाती, आदिवासी विकास विभागा मार्फत (Tribal Development Department) अनुसूचित जमाती व विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागा मार्फत (VJNT,OBC and SBC Welfare Department) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे प्रदान करण्यात येते, आपापल्या प्रवर्गासाठी योग्य ती शिष्यवृत्ती योजना निवडावी.
- Mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ याच वर्षी नव्याने कार्यान्वित झाले असल्यामुळे तसेच शासनाकडून कुठल्या शिक्षणक्रमाला/कुठल्या प्रवर्गासाठी शिष्यवृत्ती देय असल्याच्या/नसल्याच्या सूचना प्राप्त न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना यासंदर्भात मार्गदर्शन करता येत नाही, त्याबद्दल क्षमस्व.
- विद्यार्थ्यांनी सादर केलेले अनु. जाती/अनु. जमाती/ विजाभाज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील परिपूर्ण शिष्यवृत्ती अर्ज अनुक्रमे समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग व विमुक्त जाती भटक्या जमाती विभाग यांचेकडे सादर करण्यात येतील. संबंधित कार्यालयाकडून जे अर्ज शिष्यवृत्तीसाठी पात्र होतील अशा विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न (Link) बँक खात्यावर शासनामार्फतच त्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात येईल.
- शिष्यवृत्ती योजना ही केंद्र सरकारची असून राज्य सरकारच्या अखत्यारीतील उपरोक्त विभागामार्फत शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. त्यामुळे शिष्यवृत्ती योजनेचा लाभ शासनामार्फत देण्यात येतो, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांचे वय 35 वर्षापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती योजना लागू आहे.
- शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या उत्पन्न मर्यादेतील विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती योजना लागू आहे.
- यापूर्वी कुठल्याही शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती (Fresh) अर्ज भरता येईल. अशा सूचना करण्यात आल्या होत्या, मात्र द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा अर्ज भरावयाचा असल्यास त्यांनी तो स्वत:च्या जबाबदारीवर भरावा.
- शासनाने शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरविलेल्या विद्यार्थ्यांना एकरकमी शिक्षणक्रम शुल्क जमा करावे लागेल व तसे हमीपत्र लिहून द्यावे लागेल.
- मा. आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि. 21.03.2012 च्या पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/बँक वितरण/का-4/2012/407 नुसार य.च.म.मुक्त विद्यापीठाला शिष्यवृत्ती देय असून फ्रिशीप देय नाही, त्यामुळे फ्रिशीपचा अर्ज विद्यार्थ्यांनी भरू नये.
- विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरताना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचाच अर्ज भरावा
- अर्ज भरताना मान्यता प्रकार Non Granted निवडावा.

- शिष्यवृत्ती अर्ज भरताना विद्यार्थ्याने आधार कार्ड, आधार कार्ड जोडलेले बँक पासबुक, शाळा सोडल्याचा दाखला, 10 वी, 12 वी, तसेच मागील उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला इ. दस्तावेज स्कॅन करून सोबत ठेवावेत, ऑनलाईन अर्ज भरताना या दस्तावेजांच्या स्कॅन प्रतींची आवश्यकता असते.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेशित विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे राज्य - महाराष्ट्र, जिल्हा - नाशिक व तालुका - नाशिक निवडायचा आहे. सदर निवडीनंतर महाविद्यालय व विद्यापीठाच्या यादीत YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY, NASHIK असे महाविद्यालय व विद्यापीठाचे नाव दिसेल ते विद्यार्थ्यांनी निवडावे.
- विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर त्याचे प्रिंटआऊट घेऊन त्यासोबत आवश्यक दस्तावेजांच्या मूळ व सत्यप्रती जोडून (दस्तावेजांची यादी सोबत दिलेली आहे) अभ्यासकेंद्रावर जमा करणे आवश्यक आहे. अर्जाची सत्यप्रत (जोडलेल्या दस्तावेजासह) विद्यार्थ्याने स्वत:जवळ ठेवावी. सदर सत्यप्रतीवर अभ्यासकेंद्राकडे अर्ज जमा केल्याची पोहोच घ्यावी.
- विद्यार्थ्याच्या शिक्षणात खंड पडला असल्यास 100 रू.च्या बॉडपेपरवर तसे शपथपत्र (मूळ प्रत) सादर करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याने अर्जात स्वत:चा अस्तित्वात असलेला मोबाईल क्रमांक व स्वत:चा मेल आयडी लिहीणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्याचा मेल आयडी नसल्यास त्याने नविन मेल आयडी बनवून मेल आयडी व पासवर्ड लक्षात ठेवणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्ती अर्ज अभ्यासकेंद्रावर जमा करताना विद्यार्थ्याने अर्जासोबत एका पृष्ठावर विद्यार्थ्याचे नाव त्याचा कायमचा व सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, (मिळाला असल्यास) त्याचा कायम नोंदणी क्रमांक, व सध्या सुरू असलेला भ्रमणध्वनी क्रमांक व असल्यास दूरध्वनी क्रमांक लिहून सदर पृष्ठ अर्जासोबत जोडावयाचे आहे.
- विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज भरला म्हणजे शिष्यवृत्ती मंजूर झाली असा गैरसमज कृपया करून घेऊ नये. अभ्यासकेंद्र, विद्यापीठ मुख्यालय व शिष्यवृत्तीशी संबंधित शासनाचा विभाग यांचेमार्फत विद्यार्थ्याने भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची व सोबतच्या दस्तावेजांची तपासणी झाल्यानंतर व त्यात त्रुटी आढळल्यानंतर विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज रद्द होऊ शकतो.
- विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी असल्यास याबाबत विद्यार्थ्याला कळविले जाणार नाही. व विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज आपोआप रद्द होईल. त्यामुळे अर्ज बिनचूकपणे भरावा व त्यासोबत आवश्यक त्या दस्तावेजांच्या मूळ/सत्यप्रती जोडाव्यात.
- विद्यार्थ्याचा अर्ज परिपूर्ण भरलेला नसल्यास विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.
- विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज अभ्यासकेंद्रामार्फतच पाठविणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्याने कुठल्याही परिस्थितीत शिष्यवृत्ती अर्ज परस्पर विद्यापीठ मुख्यालयात पाठवू नये, अशा अर्जांची दखल घेतली जाणार नाही, व अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यात काही अडचणी उद्भवल्यास त्याची जबाबदारी मुक्त विद्यापीठाची असणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- विद्यार्थ्याने अर्जासोबत प्रपत्र अ व ब (पूर्ण माहिती नमूद करून) जोडणे आवश्यक आहे.
- शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या उत्पन्न मर्यादेतील वडिलांच्या नावाच्या (आर्थिक वर्ष 2017-18) उत्पन्न प्रमाणपत्राची मूळ व प्रमाणित सत्यप्रत जमा करणे अनिवार्य आहे.
- एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला असल्यास प्रत्येकाच्या अर्जासोबत वडिलांच्या नावाच्या उत्पन्न प्रमाणपत्राची मूळ व प्रमाणित सत्यप्रत जमा करणे अनिवार्य

आहे. तसे शक्य नसल्यास व कुटुंबातील एका व्यक्तीच्या अर्जाला मूळ प्रत जोडून उर्वरित व्यक्तींनी विनंती अर्ज देणे आवश्यक आहे.

- वडिल हयात नसल्यास त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.
- विद्यार्थ्याचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते असणे आवश्यक असून सदर खात्याशी विद्यार्थ्याचा आधार क्रमांक संलग्न (Link) असला पाहिजे.
- विद्यार्थ्याने अर्जासोबत बँक पासबुकची वाचता येईल अशी प्रमाणित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. ज्यात विद्यार्थ्याचे नाव, बँकेचे नाव, बँकेचा पूर्ण पत्ता, बँक खाते क्रमांक, IFSC Code, MICR Code असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याने त्याचा आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न असल्याबाबत बँक व्यवस्थापकाच्या स्वाक्षरी व शिक्यासह सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील Bank Account Aadhar Linkage Application Form जोडणे अनिवार्य आहे.
- नावात बदल असल्यास नाव बदलाच्या राजपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.
- महिला विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांचा विवाह झाला असल्यास राजपत्र / विवाह प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच विवाहित महिला विद्यार्थ्यांनी सासरच्या नावाने आधारकार्ड/बँक खाते असल्यास पतीचे उत्पन्न प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- जे विद्यार्थ्यांना Creamy Layer जोडणे आवश्यक आहे, अशा विद्यार्थ्यांनी रेशन कार्डची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
- शासनाच्या नियमानुसार शिष्यवृत्ती अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची संपर्कसत्रांना 75 टक्के उपस्थिती अनिवार्य आहे, ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 टक्के पूर्ण होणार नाही, अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देय राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

PRAKASH SHANKARRAO ATKARE

Digitally signed by PRAKASH SHANKARRAO ATKARE
Date: 2018.10.25 12:56:07 +05'30'

(स्थळप्रतीवर मा. संचालक, वि.से.वि., यांची स्वाक्षरी आहे)

# शिष्यवृत्ती योजनेसाठी अपात्र ठरल्यास हमीपत्र

मी श्री/श्रीमती ________________________________________ वर्ग __________ कायम नोंदणी क्रमांक ______________________ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र ____________________________________________ केंद्र सांकेतांक ________________ मध्ये शैक्षणिक सत्र 2018-19 साठी प्रवेश घेतलेला असून शासनाच्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज सोबत सादर करीत आहे.

मी सादर केलेला शिष्यवृत्ती अर्ज कुठल्याही कारणास्तव अपात्र ठरल्यास मी विद्यापीठाचे शिक्षणक्रम शुल्क तात्काळ एकरकमी भरण्याची हमी देत आहे. मी शिक्षणक्रम शुल्क न भरल्यास माझ्या होणा-या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी सर्वस्वी माझी असेल याची मला जाणीव असल्याची हमी मी या हमीपत्राद्वारे देत आहे.

स्थळ - विद्यार्थ्याचे नाव -

दिनांक - विद्यार्थ्याची स्वाक्षरी -

# शिष्यवृत्ती अर्ज स्विकारताना अभ्यासकेंद्रांसाठी मार्गदर्शक सूचना

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू आहे. शासनाचे शिष्यवृत्तीसाठी असलेले https://mahadbtmahait.gov.in/ हे संकेतस्थळ सुरू झाले असून विद्यापीठाचे नाव व विद्यापीठात अध्ययनासाठी असलेले मान्यताप्राप्त शिक्षणक्रम याचा शिष्यवृत्ती संकेतस्थळावर समावेश आहे.
- विद्यार्थ्याने सादर केलेला शिष्यवृत्ती अर्ज शासनाच्या या संकेतस्थळावरील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Government of India Post Matric Scholarship, 2018-19) योजनेचाच ऑनलाईन भरलेला अर्ज परिपूर्ण आहे की नाही याची खातरजमा करावी.
- ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज स्विकारताना अर्ज परिपूर्ण आहे की नाही याची खातरजमा करावी. विद्यार्थ्याने यापूर्वी ऑफलाईन अर्ज सादर केला असला तरीही शिष्यवृत्ती संकेतस्थळावरील शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.
- विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमास शिष्यवृत्ती योजना लागू आहे किंवा नाही याची सध्यातरी माहिती देता येत नाही.
- विद्यार्थ्याने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अर्ज तपासताना प्रथमदर्शनी विद्यार्थी शिष्यवृत्तीस अपात्र असल्याचे आपल्या निदर्शनास आल्यास विद्यापीठ मुख्यालयात खात्री करून अभ्यासकेंद्रावरच सदर अर्ज रद्द करून विद्यार्थ्यास शिक्षणक्रम शुल्क भरण्यास सांगावे.
- सद्यस्थितीत कुठल्याही शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षास (F.Y.) प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांचेच शिष्यवृत्ती अर्ज स्विकारावेत अशा सूचना यापूर्वी देण्यात आल्या होत्या, मात्र द्वितीय वर्षास विद्यार्थी अर्ज भरण्याचा आग्रह करीत असल्यास त्यास स्वत:च्या जबाबदारीवर ऑनलाईन अर्ज भरण्यास सांगावे, व विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेसाठी अपात्र ठरल्यास एकरकमी शिक्षणक्रम शुल्क भरण्याचे हमीपत्र देण्यास सांगावे.
- मा. आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि. 21.03.2012 च्या पत्र क्र. सकआ/शिक्षण/भासशि/बँक वितरण/का-4/2012/407 नुसार य.च.म.मुक्त विद्यापीठाला शिष्यवृत्ती देय असून फ्रिशीप देय नाही, त्यामुळे फ्रिशीपचे अर्ज स्विकारू नयेत.
- केंद्रावर प्राप्त अर्ज विभागीय केंद्र/विद्यापीठ मुख्यालयात पाठविताना विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पहिल्यांदाच अर्ज करतोय, की मागील वर्षी विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे, याचा उल्लेख करावा.
- शिष्यवृत्ती अर्ज विभागीय केंद्र/विद्यापीठ मुख्यालयात पाठविताना शिक्षणक्रमनिहाय व प्रवर्गनिहाय वेगवेगळे पाठवावेत.
- शिष्यवृत्ती अर्जामध्ये महाविद्यालयाचे व विद्यापीठाचे नाव Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik असेच असल्याची खात्री करावी. (अभ्यासकेंद्राचे नाव अर्जावर लिहू नये)
- अर्जामधील मान्यता प्रकार (Grant Type) Non Granted निवडला असल्याची खात्री करावी.
- विद्यार्थ्याने अर्जात लिहिलेला मोबाईल क्रमांक व मेल आयडी सुरू असल्याची खात्री करावी.
- शिष्यवृत्ती अर्जासोबत विद्यार्थ्याने एका पृष्ठावर विद्यार्थ्याचे नाव, अभ्यासकेंद्राचे नाव व सांकेतांक, त्याचा कायम नोंदणी क्रमांक (प्राप्त झाला असल्यास), विद्यार्थ्याचा कायमचा व सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, सध्या सुरू असलेला भ्रमणध्वनी क्रमांक व दूरध्वनी क्रमांक (असल्यास), लिहून सदर पृष्ठ अर्जासोबत जोडले असल्याची खात्री करावी.
- विद्यार्थ्याने पूर्ण भरलेल्या Online अर्जाचे प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करून घेताना अर्जाची सत्यप्रत (जोडलेल्या दस्तावेजासह) विद्यार्थ्याने स्वत:जवळ ठेवण्याची सूचना करावी. व सत्यप्रतीवर अभ्यासकेंद्राकडे अर्ज जमा केल्याची पोहोच द्यावी. पोहोच देताना विद्यार्थ्याने कुठले मूळ दस्तावेज जमा केले आहेत त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.
- **विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज भरला म्हणजे त्याला शिष्यवृत्ती मंजूर झाली असे नाही** तर अभ्यासकेंद्र, विभागीय केंद्र, विद्यापीठ मुख्यालय व शासनाचा शिष्यवृत्तीशी संबंधित विभाग यांचेमार्फत विद्यार्थ्याने भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची व सोबतच्या दस्तावेजांची तपासणी झाल्यानंतर शिष्यवृत्तीस विद्यार्थी पात्र किंवा अपात्र ठरेल. त्रुटी आढळल्यास विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज रद्द होऊ शकतो.
- कुठल्याही कारणाने शिष्यवृत्ती अर्ज रद्द झालेल्या विद्यार्थ्याने सूचना प्राप्त होताच तात्काळ एकरकमी शुल्क भरणे आवश्यक असल्याची जाणीव विद्यार्थ्याला करून द्यावी.

- विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी असल्यास याबाबत विद्यार्थ्याला कळविले जाणार नसल्यामुळे विद्यार्थ्याने अर्ज बिनचूकपणे भरला आहे की नाही तसेच आवश्यक त्या दस्तावेजांच्या मूळ / सत्यप्रती विद्यार्थ्याने जोडल्या असल्याची खातरजमा करण्यास विद्यार्थ्यास सांगावे व अभ्यासकेंद्रानेही खात्री करावी.
- विद्यार्थ्याचा अर्ज परिपूर्ण भरलेला व आवश्यक दस्तावेज जोडला असल्यासच स्विकारावा, याबाबत काही शंका असल्यास विद्यापीठ मुख्यालयात शिष्यवृत्ती कक्षाशी संपर्क साधावा.
- शिष्यवृत्तीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जावर वरील उजव्या कोप-यात विद्यार्थ्याचा जात प्रवर्ग व शिकत असलेल्या शिक्षणक्रमाचा सांकेतांक (G01/G02) व वर्ष (FY/SY/TY) नमूद करावे.
- विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज अभ्यासकेंद्रामार्फतच पाठविणे बंधनकारक असल्याचे विद्यार्थ्यास सांगावे.
- प्रत्येक अर्जासोबत सोबतच्या नमुन्याप्रमाणे चेकलिस्ट लावणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याचे अर्जावरील छायाचित्र विद्यार्थ्याचेच असल्याची खात्री करावी.
- विद्यार्थ्याने अर्जासोबत आवश्यक त्या सर्व दस्तावेजांची मूळ/सत्यप्रत जोडली असल्याची खात्री करून विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील चेकलिस्ट लिहून ती विद्यार्थ्याच्या अर्जास सर्वात वरती लावावी. यात केंद्र सांकेतांक, केंद्रसंयोजक व केंद्र सहायकांचा भ्रमणध्वनी क्रमांक तसेच केंद्राचा दूरध्वनी क्रमांक व मेल आयडी लिहीणे आवश्यक आहे. (मागील सत्रात केंद्राकडून ही माहिती प्राप्त झाली नव्हती)
- विद्यार्थ्याने अर्जासोबत 10 वी, 12 वी, मागील उत्तीर्ण वर्षाची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला (TC), जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वैध Non Creamy Layer, उत्पन्न दाखला, खंड प्रमाणपत्र, इतरत्र प्रवेश नसल्याचे हमीपत्र याच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती जोडल्या असल्याची खात्री करावी.
- मूळ दस्तावेजाची शासनाच्या संबंधित विभागाकडून पडताळणी केल्यानंतर मूळ दस्तावेज अभ्यासकेंद्रावर परत पाठविले जातील.
- विद्यार्थ्याने अर्जासोबत आधार कार्ड, आधार बँक लिंक दाखला, बँक पासबुक, रेशन कार्ड, वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र तसेच राजपत्राच्या वाचता येतील अशा सत्यप्रती जोडल्या असल्याची खात्री करावी.
- विद्यार्थ्याच्या अर्जासोबत अभ्यासकेंद्राने द्यावयाचे प्रपत्र अ पूर्णपणे भरून व केंद्रप्रमुख/ केंद्रसंयोजकांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह (मूळ प्रत) अर्जासोबत जोडावे.
- विद्यार्थ्याने त्याची व पालकांची स्वाक्षरी असलेले तसेच पूर्णपणे भरलेले प्रपत्र ब ची मूळ प्रत जोडले असल्याची खात्री करावी.
- विद्यार्थ्यांना त्यांची संपर्कसत्रांना उपस्थिती 75 % भरणे आवश्यक असल्याची जाणीव अर्ज स्विकारतानाच द्यावी.
- जे विद्यार्थी शिष्यवृत्तीचा अर्ज भरतील अशा विद्यार्थ्यांची संपर्कसत्रांना 75 टक्के उपस्थिती अनिवार्य असल्यामुळे शिष्यवृत्ती अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची उपस्थिती व्यवस्थित नोंदवून त्याप्रमाणे सोबतच्या नमुन्यात उपस्थिती पत्रक व उपस्थिती दाखला विद्यापीठ मुख्यालयाकडे पाठवावा.
- अभ्यासकेंद्राने शिष्यवृत्तीसाठी आवश्यक चेकलिस्टप्रमाणे व शासनाने सूचित केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी दस्तावेज जोडले आहेत का ? ते तपासून चेकलिस्ट तयार करावी. सर्व दस्तावेज मूळ शाळा सोडल्याचा दाखला, मूळ उत्पन्न प्रमाणपत्र, मूळ गुणपत्रिका जोडल्याची खात्री करून विभागीय कार्यालय/विद्यापीठ मुख्यालयात शिष्यवृत्ती अर्ज पाठवावेत. त्रुटी असलेले अर्ज अभ्यासकेंद्रावरच रद्द करावेत, अपूर्ण अर्ज पाठविल्यास व त्यातून काही प्रश्न निर्माण झाल्यास त्यास अभ्यासकेंद्र जबाबदार राहील.
- Govt. Of India पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना ही केंद्र शासन यांची आहे. या योजनेसाठीचे निकष भारत सरकार यांनी घालून दिलेले आहेत. भारत सरकार व राज्य सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी बदलांच्या सूचना स्विकाराव्या लागतात. शासनाच्या GOI Post Matric Scholarship च्या Portal ला तसेच मुक्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Scholarship ला सातत्याने आपणही भेट द्यावी, व विद्यार्थ्यांनाही सूचित करावे.
- शिष्यवृत्तीबाबतची माहिती केंद्रांना वारंवार कळविता यावी यासाठी या शैक्षणिक सत्रापासून Whats App चा वापर करण्याचा मानस यापूर्वी व्यक्त केला होता. त्यानुसार YCMOUScholarship व YCMOUScholarship1 असे दोन समूह स्थापन करण्यात आले आहे, आपण यात सामील झाले नसल्यास आपला भ्रमणध्वनी, नाव व पदनाम (केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक/केंद्रसहायक) 94037 74810 या क्रमांकावर कळवावा.

- 35 वर्षापेक्षा जास्त वय असणा-या विद्यार्थ्यांना भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती लागू नसल्यामुळे विद्यार्थी 35 वर्षापेक्षा कमी वयाचा असल्याची खात्री करावी.
- शिष्यवृत्तीसाठी पात्र असणा-या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज एकत्रितपणे विभागीय केंद्राकडे पाठविताना त्यासोबत अभ्यासकेंद्राचे पत्र देणे आवश्यक असून या पत्रात शैक्षणिक सत्रासह, प्रवर्गनिहाय व शिक्षणक्रमनिहाय विद्यार्थीसंख्येचा उल्लेख करून विद्यार्थ्यांची प्रवर्गनिहाय व शिक्षणक्रमनिहाय यादी जोडणे आवश्यक आहे.
- विभागीय केंद्र/ विद्यापीठ मुख्यालयात शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना ते प्रवर्गनिहाय (SC/VJNT/OBC/SBC) वेगवेगळे सादर करावेत
- अभ्यासकेंद्राच्या पत्रासोबत सोबतच्या नमुन्याप्रमाणे Statement B ची प्रत जोडणे आवश्यक असून त्याची Soft Copy scholarshipycmou@gmail.com या मेल आयडीवर पाठवावी.
- या सूचनांसोबतच सोबत विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या सूचनाही केंद्रप्रमुख, केंद्रसंयोजक व केंद्रसहायकांनी वाचाव्यात, ही विनंती.

**विद्यार्थ्यांकडून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा अर्ज स्विकारताना व सदर अर्ज सोबतच्या आवश्यक दस्तावेजांसह विद्यापीठात पाठविताना उपरोक्त सूचनांचे पालन करावे, ही विनंती.**

PRAKASH SHANKARRAO ATKARE

Digitally signed by PRAKASH SHANKARRAO ATKARE
Date: 2018.10.25 15:06:24 +05'30'

(स्थळप्रतीवर मा. संचालक, वि.से.वि., यांची स्वाक्षरी आहे)

# Bank Account-Aadhaar Linkage Application Form

The Branch Manager,

___________________ Branch                                                                                Date:     /     /

Dear Sir / Madam,

**Bank Account No. ………………………………………………………… in my name Linking of Aadhaar / UID Number with the Account.**

I am maintaining a Bank Account number ……………………………….…….. with your Branch. I submit my Aadhaar number and voluntarily give my consent to :

- Seed my Aadhaar / UID number issued by UIDAI, Government of India in my name with my aforesaid account.
- Map it at NPCI to enable me to receive Direct Benefit Transfer (DBT) from Government of India in my above account. I understand that if more than one Benefit transfer is due to me, I will receive all Benefit Transfers in this account.
- Use my Aadhaar details to authenticate me from UIDAI.
- Use my mobile number mentioned below for sending SMS alerts to me.

The particulars of the Aadhaar / UID letter are as under:

Aadhaar / UID number :……………………………………………………………………….....
Name of the Aadhaar Holder as in Aadhaar card :…………………………………………………

I have been given to understand that my information submitted to the Bank herewith shall not be used for any purpose other than mentioned above, or as per requirements of law.

Yours faithfully,

(Signature / Thumb impression of the account holder)

Name :………………………………………………………………………..

Mobile No. :…………………………………………………………………..

Email :…………………………………………………………………………

Enclosure : copy of the Aadhaar letter self-attested.

…………………………………………………………………………………………………………

**Confirmation of insertion / linking of Aadhaar number with Bank account**

The Account number ……………………………… of Shri / Smt. ……………………….………… ...................................with ………………………………  Branch has been linked with Aadhaar / UID number ……………………………………And mobile number …………………………………

**Date :     /     /**                                                                                **(Bank's authorized official)**

# इतरत्र प्रवेश नसल्याचे हमीपत्र

मी श्री/श्रीमती ........................................................................ वर्ग ................. कायम नोंदणी क्रमांक ............................................. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र ............................................................................. केंद्र सांकेतांक ............................ मध्ये शैक्षणिक सत्र 2018-19 साठी प्रवेश घेतलेला आहे.

याबाबत मी लेखी हमी देतो / देते की, मी इतरत्र कोणत्याही शाखेत / महाविद्यालयात प्रवेश घेतलेला नाही. तसे आढळून आल्यास मी शिष्यवृत्तीस अपात्र होईल व याची सर्वस्वी जबाबदारी माझी असेल व होणा-या नुकसानास मी स्वतः जबाबदार असेल.

| | |
|---|---|
| स्थळ - | विद्यार्थ्याचे नाव - |
| दिनांक - | विद्यार्थ्याची स्वाक्षरी - |

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक संचलित अभ्यासकेंद्र**

# (अभ्यासकेंद्राचे नाव)

**(अभ्यासकेंद्राचा सांकेतांक)**

**(अभ्यासकेंद्राचा पत्ता पिनकोडसह)**

दूरध्वनी क्रमांक (STD कोडसह) -

अभ्यासकेंद्राचा ईमेल केंद्रसंयोजकांचा ईमेल केंद्रसहायकाचा ईमेल

---

जा.क्र. दिनांक : / /

## <u>उपस्थिती प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करण्यात येते की, ............................(विद्यार्थ्याचे पूर्ण नाव), ..................... (कायम नोंदणी क्रमांक) हा विद्यार्थी / ही विद्यार्थीनी .................. (शिक्षणक्रमाचे नाव व सांकेतांक उदा. (FYBA / SYBA / TYBA (G01) इ.) या शिक्षणक्रमात प्रवेशित असून विद्यार्थ्याच्या उपस्थिती पत्रकानुसार विद्यापीठाने या शिक्षणक्रमासाठी निश्चित केलेल्या तासिकांना त्याची उपस्थिती 75 टक्केपेक्षा जास्त आहे. विद्यार्थ्यांचे मूळ हजेरीपत्रक आमच्या अभ्यासकेंद्रावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरी
(केंद्रप्रमुख / केंद्रसंयोजक)
अभ्यासकेंद्राचा शिक्का

(केंद्रसंयोजकाचे नाव) ......................................
(भ्रमणध्वनी क्रमांक) ......................................

(केंद्र सहायकाचे नाव) ......................................
(भ्रमणध्वनी क्रमांक) ......................................

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

संपर्क सत्र हजेरीपत्रक

शिक्षणक्रमाचे नाव                                   शिक्षणक्रम सांकेतांक

अभ्यासकेंद्राचे नाव                                   अभ्यासकेंद्र सांकेतांक

विद्यार्थ्याचे नाव                                   शैक्षणिक सत्र

---

| **अ.क्र.** | **दिनांक** | **स्वाक्षरी** | **अ.क्र.** | **दिनांक** | **स्वाक्षरी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

स्वाक्षरी

(केंद्रप्रमुख / केंद्रसंयोजक)

अभ्यासकेंद्राचा शिक्का

दिनांक :      /    /2018

## नोकरी करत नसल्याचे हमीपत्र

मी श्री/श्रीमती .......................................................................... हमीपत्र लिहून देतो/ देते की, मी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ........................................................................... या अभ्यासकेंद्रावर ........................................................................... या पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी/ शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छितो/इच्छिते. मी अनुसूचित जाती / विमुक्त जाती /भटक्या जमाती / इतर मागासवर्ग / विशेष मागास प्रवर्गासाठी असणा-या सुविधांचा लाभ घेण्यास पात्र आहे.

मी इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेत नाही व मी कोठेही खाजगी किंवा सरकारी नोकरीत नाही.

करीता हमीपत्र लिहून देत आहे जे माझ्या सूज्ञ बुद्धीनुसार बरोबर व खरे आहे. खोटे आढळून आल्यास मी होणा-या शिक्षेस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

**लिहून देणार**

# “परिशिष्ट - अ”

**(शासन निर्णय क्र. इबीसी 2017/प्र.क्र.524/शिक्षण-1, दिनांक 29 जानेवारी,2018 च्या सहपत्रानुसार)**

## सन 2018-19 या शैक्षणिक वर्षाकरिता शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. ची अनुज्ञेय रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर मिळण्यासाठी विद्यार्थी व पालकाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

### (अ) महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

(i) श्री. ------------------------------------------------------------------------ या अर्जदाराने सोबतच्या बंधपत्रात नमूद केलेली सर्व माहिती, त्याच्या कुटुंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहाबाहेर राहण्याची माहिती, शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र, इ. तपशिल त्याच्या मूळ कागदपत्रांवरून पूर्णपणे तपासण्यात आला असून, अर्जात नमूद केलेला तपशिल बरोबर आहे. त्यानुसार श्री / श्रीमती ............................................................................ (प्राचार्यांचे नाव) ................................................................................................... या शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत असून, त्या अधिकारात उपरोक्त विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, इतर शुल्क मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे.

(ii) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची शिक्षण शुल्क व तर शुल्काची रक्कम जी महाविद्यालयाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबींचे हिशेब ज्या प्राधिका-याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिका-याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी महाविद्यालय सोडून गेल्यास किंवा त्याने विनापरवानगी अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमिततेमुळे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती/ शिक्षण फी, परीक्षा फी व इतर शुल्काची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचा शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहील.

(iii) विद्यार्थ्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, अर्जदाराने दिलेल्या मूळ कागदपत्रांचे आधारे मी तपासलेली आहे. तसेच अर्जदारानी सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये कोणताही बदल, खाडाखोड, दुरूस्ती वा फेरफार आढळून आला नाही.

(iv) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, अर्जदार हा आमचे महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहे. त्याने कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती 75% पेक्षा अधिक आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाने कोणतेही शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर अनुज्ञेय शुल्क घेतलेले नाही.

(v) आमचे महाविद्यालय हे मान्यता प्राप्त आहे, ते विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिका-यांनी मान्यता दिलेले आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ही सक्षम प्राधिका-याने दिलेल्या मान्यतेनुसारच असून, त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित सक्षम कार्यालयास फॉरवर्ड केले आहेत. त्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क सुद्धा, संबंधित सक्षम प्राधिकारी/विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाहीत. शासन/विद्यापीठ/सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करून त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधीन राहून विद्यार्थ्याचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची देय रक्कम, संबंधितांचे आधार संलग्न बँक खात्यावर जमा होण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता, उणिवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालयाची असेल.

जावक क्रमांक

दिनांक

ठिकाण

प्राचार्यांची स्वाक्षरी ..........................................................

संपूर्ण नाव ..........................................................

महाविद्यालयाचा शिक्का

टिप :- प्रस्तावासोबत विद्यार्थी/पालकांनी व महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र प्राचार्यांनी एकत्रितच संलग्न करून द्यवायाचे आहे.

# (ब) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

(1) मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधानाप्रमाणे होणा-या दंडास / शिक्षेस मी / आम्ही पात्र आहे / आहोत. अर्जात नमूद केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती वा निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिका-याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल, अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अनुज्ञेय रकमेपेक्षा अधिक मिळाली तर मी / आम्ही ती शासनास जमा करू. अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे शासनास परत करण्याची हमी देतो.

(2) माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नाची व जातीची अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझ्या / माझ्या पाल्याच्या विरुद्ध होणा-या कारवाईस मी / आम्ही स्वत: जबाबदार राहू.

(3) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे, मी सक्षम अधिका-याकडून / प्राधिका-याकडून प्राप्त केलेली असून, ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार / दुरुस्ती / बदल केलेला नाही. सदरील कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी / आम्ही पूर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम 199 व 200 नुसार लागू होणा-या शिक्षेस मी / आम्ही पात्र राहू, याची मला / आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

(4) सन 2018-19 या वर्षाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम माझ्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा होताच, त्यापैकी महाविद्यालयास देय असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम सात दिवसात महाविद्यालयात जमा करून त्याची रितसर पावती प्राप्त करून घेण्याची माझी / आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उद्भवणा-या परिणामास मी / आम्ही वैयक्तिक जबाबदार असू असे प्रतिज्ञापूर्वक हमीपत्र / बंधपत्र मी / आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण

दिनांक

**(अर्जदाराच्या वडिलांची/पालकांची सही व पूर्ण नाव)** **(अर्जदाराची सही व पूर्ण नाव)**

# विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाच्या दस्तावेजांची यादी

1. 10 वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
2. 12 वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण गुणपत्रिका मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
3. पूर्वशिक्षणाची गुणपत्रिका मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
4. शाळा सोडल्याचा दाखला मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
5. जात प्रमाणपत्र मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
6. जात वैधता प्रमाणपत्र मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
7. Non Creamy Layer मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
8. VJNT/OBC/SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्पष्ट दिसेल अशी रेशनकार्ड़ची प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
9. आधार कार्डची स्पष्ट वाचता येईल अशी प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
10. आधार बँक लिक दाखल्याची स्पष्ट वाचता येईल अशी प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
11. विद्यार्थ्याचे नाव, खाते क्रमांक, बँकेचा पत्ता, बँकेचा IFSC क्रमांक स्पष्ट दिसेल अशी बँक पासबुकची प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
12. वडिलांच्या नावाच्या उत्पन्न दाखल्याची आर्थिक वर्ष 2017-18 ची मूळ प्रत
13. वडिल मयत असल्यास त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची स्पष्ट दिसेल अशी प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
14. आजोबांच्या नावाने उत्पन्न दाखला असल्यास नुकतीच काढलेली व स्ष्ट दिसेल अशी रेशनकार्डची प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
15. विद्यार्थ्याच्या शिक्षणात खंड पडला असल्यास खंड प्रमाणपत्राची स्पष्ट दिसेल अशी मूळ प्रत (Original Copy) व प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
16. महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र मूळ प्रत (सोबत नमुना जोडला आहे)
17. विद्यार्थी व पालकांची स्वाक्षरी / अंगठा असलेले विद्यार्थी व पालकांचे बंधपत्र ब मूळ प्रत (सोबत नमुना जोडला आहे)
18. अभ्यासकेंद्राने अर्जासोबत द्यावयाची चेकलिस्ट (सोबत नमुना जोडला आहे)
19. विद्यार्थ्याची उपस्थिती 75 % असल्याचा दाखला (सोबत नमुना जोडला आहे)
20. विद्यार्थ्याची उपस्थिती यादी (सोबत नमुना जोडला आहे)
21. विद्यार्थ्याने इतरत्र कोठेही प्रवेश घेतला नसल्याचे हमीपत्र (सोबत नमुना जोडला आहे)
22. नावात बदल असल्यास नाव बदलाची नोंद असलेल्या राजपत्राची स्पष्ट दिसेल अशी प्रमाणित सत्यप्रत (Attested Xerox)
23. विद्यार्थी नोकरी करीत नसल्याचे हमीपत्र
24. व्यावसायिक (Professional) शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्राची मूळ प्रत व प्रमाणित सत्यप्रत
25. शिष्यवृत्तीस अपात्र ठरल्यास हमीपत्र